मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हे वगळता इतर सर्व जिल्ह्यात कार्यरत ३४ आय.टी.असिस्टंट या पदांना दि. ०२ जून, २०२६ ते दि. ३१ ऑगस्ट, २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्याबाबत.....

महाराष्ट्र शासन

मदत व पुनर्वसन विभाग (आपत्ती व्यवस्थापन प्रभाग)

शासन निर्णय क्रमांक.मंनिक-२०२५/प्र.क्र.१६/मंनिक २

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,

मंत्रालय, मुंबई- ४०००३२

दिनांक : १५ जुलै, २०२६

वाचा : १.महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसन) शासन निर्णय क्रमांक आव्यप्र- २०२३/प्र.क्र. २३/ आव्यप्र-१, दिनांक १० एप्रिल, २०२३.

२.महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसन) शासन निर्णय क्रमांक आव्यप्र-२०२४/प्र.क्र.१४१/ आव्यप्र-१,दिनांक ८ ऑक्टोबर, २०२४.

३.सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-१७२५/प्र.क्र.२०६/(मातं), दि. ०४ जून २०२६

४. महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसन) शासन निर्णय क्रमांक आव्यप्र-२०२५/प्र.क्र.१६/ मंनिक-२,दिनांक ०८ जून, २०२६.

५.दिनांक १० जुलै, २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या बैठकीचे इतिवृत

प्रस्तावना :

(अ) राज्यातील मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हे वगळता सर्व जिल्ह्यात जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणासाठी प्रत्येकी १ आय. टी. असिस्टंट यांची सेवा महा-आयटी यांचेमार्फत उपलब्ध करून देण्यास उक्त वाचा क्र. १ येथील दिनांक १० एप्रिल, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार महा-आयटी यांचेमार्फत एकूण ३४ आय.टी. असिस्टंटची संबधित जिल्ह्यात नियुक्ती करण्यात आली आहे.

(आ) सद्यस्थितीत उक्त ३४ आय.टी.असिस्टंट यांच्या नियुक्तीचा कालावधी दिनांक ३० मे, २०२६ रोजी संपुष्टात आल्याने तसेच सदर कार्यालयीन सहायक यांच्या सेवा संबंधित जिल्हयात आवश्यक असल्याने, उक्त नमूद कार्यालयीन सहायक यांना मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव दिनांक १० जुलै, २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या बैठकीत मान्यतेस्तव सादर करण्यात आला होता. सदर बैठकीत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला.

सामान्य प्रशासन विभागाच्या दि. ०४ जून २०२६ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाकडून पुरविण्यात येणाऱ्या तांत्रिक मनुष्यबळास मुदतवाढ देण्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत .सदर शासन निर्णयानुसार --

"सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२७.०९.२०२२ च्या शासन निर्णयास ३महिन्यांसाठी म्हणजेच दि. ३१.०८.२०२६ रोजीपर्यंत किंवा महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाकडून मनुष्यबळ पुरविण्याची निविदा प्रक्रिया राबविण्याची कार्यवाही पूर्ण होऊन शासन निर्णय निर्गमित होईपर्यंत, जे अगोदर घडेल तोपर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे."

सामान्य प्रशासन (माहिती व तंत्रज्ञान) विभागाच्या दि. ३१ मार्च, २०२६ च्या शासन निर्णयानुसार ३४ आय.टी.असिस्टंट यांना मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

०१. राज्यातील मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हे वगळता सर्व जिल्ह्यात जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकारणासाठी प्रत्येकी १ यानुसार एकूण ३४ आय.टी.असिस्टंट या कंत्राटी पदांना एक दिवसाचा तांत्रिक खंड देवून, **०२ जून, २०२६ ते दि. ३१ ऑगस्ट, २०२६** या कालावधीकरीता मुदतवाढ देण्यात येत आहे.

०२. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी यांनी सदर आय.टी. असिस्टंट यांचा मासिक उपस्थिती अहवाल प्रत्येक महिन्याच्या १ तारखेला सादर करण्याची दक्षता घ्यावी.

०३. या कामी होणारा खर्च मागणी क्र.सी (०६), २२४५, नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य, ८० सर्वसाधारण (०१) (०१) महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे कार्यालय स्थापन करणे व फर्निचर व साधनसामुग्रीसह सुसज्जीकरण करणे (२२४५ १७६१) १०-कंत्राटी सेवा या लेखाशिर्षांतर्गत त्या त्या वर्षाकरिता मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा.

०४. सदर शासन निर्णय दि. २२ जानेवारी, २०२६ अन्वये प्रकल्प अंमलबजावणी समितीस प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय मर्यादेत व समितीने दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमाक २०२६०७१५१२१४२४४१४१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल याच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by YOGITA RAJENDRA GAWTHE
Date: 2026.07.15 12:15:26 +05'30'

(योगिता रा. गावठे)
कार्यासन अधिकारी , महाराष्ट्र शासन

प्रति,

१. प्रधान सचिव (म व पु. आ. व्य) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
२. संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
३ विभागीय आयुक्त (सर्व),
४. जिल्हाधिकारी (सर्व),
५ महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर,
६. महालेखापाल (लेखा परिक्षा), मुंबई/ नागपूर,
५ संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
७. लेखाधिकारी, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय, मुंबई
८.निवडनस्ती/मनिक-२